| | | | |
|---|---|---|---|
| MHRT050003252024 | दाखल तारीख | : | १९.०४.२०२४ |
| | नोंदणी तारीख | : | १९.०४.२०२४ |
| | निकाल तारीख | : | १०.०३.२०२६ |
| | कालावधी | : | वर्ष ०१ महिने १० दिवस २१ |

भाग 'अ'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i))

**खेड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

**(पिठासिन अधिकारी श्री. एस. एम. चव्हाण)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी.**

**(जाहीर दिनांक: १०.०३.२०२६)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१८०/२०२४**

(गु.र.क्र.१००/२०२४ पोलीस ठाणे, खेड)

**निशाणी क्र.६ लगत**

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र सरकार**<br>**पोलीस ठाणे, खेड**<br>ता.खेड, जि. रत्नागिरी. |
| **प्रतिनिधीत्व** | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता सौ.व्ही.जी.गायकवाड.** |
| **आरोपी** | **अविनाश नारायण चव्हाण,**<br>वय – ५२ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>रा.बोरघर, ब्राम्हणवाडी, ता.खेड, जि.रत्नागिरी. |
| **प्रतिनिधीत्व** | **आरोपीकरीता वकील श्री.एस.एस.शेठ.** |

भाग 'ब'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | २५.०३.२०२४ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | २५.०३.२०२४ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | १९.०४.२०२४ |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | १८.०७.२०२३ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | १६.०६.२०२५ |
| निकालाची आरक्षीत तारीख | -- |
| निकालाची तारीख | १०.०३.२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | लागू नाही. |

**आरोपीचा तपशिल**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **अविनाश नारायण चव्हाण** | फौ.प्र.सं.क. ४१अ(१) प्रमाणे नोटीस देण्यात आली. | -- | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे | निर्दोष मुक्त केले. | -- | निरंक |

## <u>न्यायनिर्णय</u>

## (घोषित दिनांक १०.०३.२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरीता चालविण्यात आला.

**०२.** अभियोग पक्षाकडून केवळ फिर्यादीला तपासण्यात आले. त्यांच्या साक्षीतून आरोपीविरुद्ध दोषसिध्दीदर्शक पुरावे मिळून आल्याने आरोपीचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ नुसार निवेदन (निशाणी ६ लगत) नोंदविण्यात आले.

**०३.** अभियोग पक्षाची हकीकत, अभिलेखावरील पुरावा व आरोपीचा बचाव विचारात घेता, मी खालील मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्यावरील माझे निष्कर्ष मी त्या करिताचे कारणांसह विस्तृत करीत आहे.

| अ.क्र. | <u>विचारार्थ मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, | |

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| | दि.२५.०३.२०२४ रोजी १८ः३० वा.चे सुमारास बोरघर, ब्राम्हणवाडी, ता.खेड, जि.रत्नागिरी येथे आरोपी हा त्याच्या घराच्या पाठीमागील बाजुस १८० मि.ली. मापाच्या देशी दारु संत्र जीएम च्या ०८ प्लॅस्टीकच्या बाटल्या, १८० मि.ली. मापाच्या डी.एस.पी. ब्लॅकच्या ०५ बाटल्या, १५ लि. मापाचा प्लॅस्टीक कॅन गावठी हातभट्टी दारुने भरलेला असा मुद्देमाल गैरकायदा बिगरपरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने त्याचे ताब्यात बाळगताना मिळून आला व त्याद्वारे त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**०४.** आरोपीविरुध्द निर्धारित केलेले दोषारोप शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षाने या न्यायनिर्णयाच्या 'भाग क' मधील नमुद साक्षीदाराच्या साक्षी पुराव्यांवर भिस्त ठेवली आहे.

**०५.** मी अभियोग पक्षातर्फे सौ.व्ही.जी.गायकवाड, सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीकरिता विधीज्ञ श्री.एस.एस.शेठ यांचा युक्तिवाद ऐकला.

**विचारार्थ मुद्दा क्र.१ करीता –**

**०६.** प्रस्तुत खटल्यामध्ये अभियोग पक्षाने केवळ फिर्यादीला तपासले आहेत. फिर्यादी साक्षीदार क्र.१ अलिमोद्दीन बदीयोद्दीन शेख यांच्या साक्षीनुसार

दि.२५.०३.२०२४ रोजी सदर गुन्ह्याचा तपास त्यांच्याकडे सोपविण्यात आला. त्यांनी सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या कागदपत्रांचे अवलोकन करुन साक्षीदार पोलीस शिपाई श्रीकृष्ण बांगर/६६, वैभव ओहोळ/६२, महिला शिपाई श्रध्दा पवार यांचे तपास टिपन नोंदविले. जप्त मुद्देमाल न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा कोल्हापूर येथे तपासणीसाठी पाठविल्याबाबत पत्राची प्रत त्यांनी तपास कामी सामील केली. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावे प्राप्त झाल्याने त्यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

०८. अभिलेखाचे अवलोकन केले असता रासायनिक विश्लेषणाचा अहवाल अभियोग पक्षाकडून अद्यापही सादर करण्यात आलेला नाही, किंबहुना जो मुद्देमाल मिळून आला होता तो दारु म्हणजेच अल्कोहोल होता हे रासायनिक विश्लेषण अहवालाशिवाय शाबित होत नाही. अभियोग पक्ष समन्स काढूनही इतर साक्षीदारांना साक्ष कामी हजर करु शकले नाही. अभियोग पक्षाने फिर्याद तसेच घटनास्थळ पंचनामा सिध्द केले नाही. आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्यास एकमेव तपास अधिकारी यांची साक्ष पुरेशी नाही. एकंदरीत, आरोपी हा विक्री करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीरपणे गावठी हातभट्टी दारु बाळगून होता हे संशयापलीकडे जावून सिध्द झाले नसल्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवितो व मुद्दा क्र. २ करीता खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. आरोपी **अविनाश नारायण चव्हाण** याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपातून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल यापुर्वी नाश केला

नसल्यास अपिल कालावधी संपल्यानंतर नाश करणेत यावा.

३. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र पुढील सहा महिन्याकरीता लागू राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित करण्यात आला.)

CHAVAN SANJAY MOTIRAM

Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.10 16:52:40 +0530

**(एस. एम. चव्हाण)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड,

ता.खेड, जि.रत्नागिरी.

**दिनांकः १०.०३.२०२६**

भाग 'क'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (**iii**))

## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. सरकारी

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|---|
| अ.सा.१ | अलिमोद्दीन बदीयोद्दीन शेख, पो.हवा. | तपासिक अंमलदार | ६ लगत |

### ब. बचावाचे साक्षीदार

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|---|
| **नाही.** | | | |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|---|
| **नाही.** | | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

### अ. सरकारी

| **क्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| **नाही.** | | |

### ब. बचाव

| **क्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| **नाही.** | | |

### क. न्यायालयीन निशाण्या

| **क्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| **नाही.** | | |

### मुद्देमाल

| **क्रमांक** | **मुद्देमाल वस्तू क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | -- | १८० मि.ली. मापाच्या देशी दारु संत्र जीएमच्या ०८ प्लॅस्टीकच्या बाटल्या |
| २. | -- | १८० मि.ली. मापाच्या डी.एस.पी. ब्लॅकच्या ०५ बाटल्या |
| ३. | -- | १५ लि. मापाचा प्लॅस्टीक कॅन गावठी हातभट्टी दारुने भरलेला |
| ४. | -- | एक स्टीलचा ग्लास |

CHAVAN SANJAY MOTIRAM

Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.10 16:52:47 +0530

**(एस. एम. चव्हाण)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड,

ता.खेड, जि.रत्नागिरी.

**दिनांकः १०.०३.२०२६**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | S.C.C. No.180/2024 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Sou. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Court, Khed. |
| Date of Decision | : | 10.03.2026 |
| Judgment/Order signed by Presiding Officer on | : | 10.03.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 10.03.2026 |